महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्रं. - 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट / 180 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड / 2025 / दिनांक : 01 / 05 / 2025

# 1)घरफोडी :–

**1)वजिराबाद** :–दिनांक 30.04.2025 रोजी 04.30 वा. चे सुमारास, **आरतीया हाईटस बाफना नांदेड येथे,** यातील अज्ञात तीन चोरटयानी तोंडाला मास्क व रूमाल बांधुन फिर्यादीचे दुकानाचे शटर वाकवुन आत प्रवेश करून दुकानात ठेवलेले मोबाईल, डिझिटेक माईक, स्मार्ट वॉचेस व नगदी असा एकुण 32,750 / –रू चा मुद्देमाल चोरून नेला. वगैरे **फिर्यादी महमद नाविद आजिम पि. हमद इशरत, वय 32 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. माळटेकडी स्टेशन रोड असकॉलनी नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरून **पोस्टे वजिराबाद** गुरन 181 / 2025 कलम 331(4), 305(अ), 3(5) बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि / श्री माडगे, मो. नं. 7507527479** हे करीत आहेत.

**2)हिमायतनगर** :–दिनांक 28.04.2025 रोजी रात्री 08.00 ते दि. 30.04.2025 चे सकाळी 08.00 वा. चे दरम्यान, **उमरचौक हिमायतनगर ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे किराणा दुकानाचे मागचे दार तोडुन आत प्रवेश करून नगदी 12,000 / –रू चोरून नेले. वगैरे **फिर्यादी खान हाजीर सलालखान, वय 48 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. उमर चौक हिमायतनगर ता. हिमायतनगर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरून **पोस्टे हिमायतनगर** गुरन 88 / 2025 कलम 331(4), 305(अ), 324(4) 3(5) बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि / श्री जाधव, मो. नं. 9821869685** हे करीत आहेत.

# 2)चोरी :–

**लोहा** :– दिनांक 29.04.2025 रोजी 15.40 वा. चे सुमारास, **आठवडी बाजारात बाजार समितीच्या समोर लोहा ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे लोहा येथील आठवडी बाजारात भाजीपाला खरेदी करीत असतांना फिर्यादीच्या शर्टच्या वरच्या खिशात ठेवलेला रियलमी कंपणीचा जी–16 मोबाईल किंमत 30,000 / –रू चा कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी भिमराव संभाजी जोंधळे, वय 45 वर्षे, व्यवसाय शेती रा. किरोडा ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 123 / 2025 कलम 303(2), बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ / 2536 राठोड, मो. नं. 9822630689** हे करीत आहेत.

# 3)अपघात :–

**नांदेड ग्रामीण** :–दिनांक 28.04.2025 रोजी सायंकाळी 06.00 वा. चे पुर्वी, **धनेगाव रोडवरील साईप्रसाद पार्कींगच्या बाजुला गणराज ग्लास सेंटर समोर रोडवर ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचा मोठा भाऊ मयत नामे **निळकंठ सहदेव सीरसे, वय 24 वर्षे, व्यवसाय ड्रायव्हर रा. जाकापुर ता. कंधार** हा त्याचे मीत्र दिलीप गदमवाड, रा. भुत्याचीवाडी ता. कंधार यांची मोटार सायकल क्रमांक एमएच–26 / बीआर–3822 वर बसुन कामानिमित्त जात असतांना धनेगाव रोडवरील साईप्रसाद पार्कींगच्या बाजुला गणराज ग्लास सेंटर समोर रोडवर ता. जि. नांदेड येथे उभा असतांना टाटा कंपणीची पांढऱ्या रंगाची ट्रॅव्हल्स क्रमांक एमएच–14 / बीए–9588 च्या चालकाने आपले वाहन हयगय व निष्काळजीपणे चालवुन यातील मयतास धडक देवुन गंभीर जखमी करून त्याचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी शिवाजी सहदेव सीरसे, वय 21 वर्षे, व्यवसाय क्लिनर रा. जाकापुर ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं. 416 / 2025 कलम 281, 106(1), बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि / श्री भोसले, मो.नं. 9765292989** हे करीत आहेत.

# 4)पाण्यात बुडून मृत्यु :–

**माहुर** :–दिनांक 29.04.2025 रोजी संध्याकाळी 16.00 वा. ते दिनांक 30.04.2025 रोजी 04.00 वा. चे दरम्यान, **मौ. पवनाळा (खालचा) ता. माहुर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे फुलाबाई बाबुसिंग राठोड, वय 42 वर्षे, व्यवसाय शेती रा. पवनाळा (खालचा) ता. माहुर जि. नांदेड** ही गावाजवळील विहीरीकडे पाणी आणण्यासाठी गेली असता विहीरीत पडुन पाण्यात बुडून मरण पावली. वगैरे **खबर देणार वसंत उत्तम राठोड, वय 42 वर्षे, व्यवसाय शेती रा. पवनाळा (खालचा) ता. माहुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरून **पोस्टे माहुर आ. मृ. 10 / 2025** कलम 194 बीएनएसएस–2023 कायदा प्रमाणे अ. मृ. दाखल असुन **तपास पोहेकॉ / 1326 गजानन चौधरी, मो.नं. 9158134034** हे करीत आहेत.

## 5)प्राणी छळ प्रतिबंधक कायदा :–

**इस्लापुर :–** दिनांक 30.04.2025 रोजी सकाळी 03.30 वा. चे सुमारास, **फॉरेस्ट चेक नाका इस्लापुर ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे युनूस खान आयुब खान पठाण, वय 34 वर्षे, व्यवसाय चालक रा. उमर चौक हिमायतनगर ता. हिमायतनगर यांने विना परवाना बेकायदेशीररित्या नऊ गोवंशिय जातीचे जनावरे किंमत 1,32,000/– रूपयाचे निर्दयीपणे चारा पाणी न करता पांढऱ्या रंगाचा बोलेरो पिकअप वाहन क्रमांक एमएच–49/बी–1276 किंमत 5,00,000/–रू मध्ये कोंबुन वाहतूक करीत असतांना अशा एकुण 6,32,000/–रू चे मुद्देमालासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोनि/श्री उमेश बालाजी भोसले, ने. पोस्टे इस्लापुर** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे इस्लापुर** गुरनं 46/2025 कलम 11(1)(घ)(ड) महाराष्ट्र प्राणी छळ प्रतिबंधक कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/658 केंद्रे,** मो.क्रं. 9823625150 हे करीत आहेत.

## 6)जुगार :–

**माहुर :–** दिनांक 29.04.2025 रोजी 22.30 वा. चे सुमारास, **पुसद ते माहुर येणाऱ्या जाणाऱ्या रोडच्या बाजुस टी पाईंट जवळ माहुर ता. माहुर जि. नांदेड येथे** यातील आरोपी नामे 1.विजय रामदास तिवसकर, वय 47 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. बसस्टॅण्ड जवळ माहुर 2. कासीम खाकरा रा. माहुर जि. नांदेड यांनी विना परवाना बेकायदेशिररित्या संगणमत करून आयपीएल कोलकात्ता नाईट रायडर्स विरूध्द दिल्ली कॅपिटल क्रिकेट मॅचवर अवैधरित्या पैसे कमविण्याच्या उद्देशाने सटटा लावुन जुगार खेळत व खेळवित असतांना जुगाराचे साहित्य, मोबाईल व नगदी असा एकुण 22,400/–रूपयाचे मालासह सटटा नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री महेश अशोकराव कोरे, ने स्थागुशा** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे माहुर गुरनं 58/2025 कलम 12(अ)** म जु का प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/1326 चौधरी, मो. नं. 9158134034** हे करीत आहेत.

.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड